साईज्योती मुळव्याध हॉस्पिटल
मुळव्याध, भगंदर, फिशर
आयुर्वेदिक औषधोपचार, क्षारसुत्र, इंजेक्शन व व्हेसल सिलर (जर्मनी) लेझर मशिनव्दारे उपचार
डे केअर सेंटर (ॲडमिट राहण्याची गरज नाही)
डॉ. तुषार गलांडे • डॉ. सौ. काजल गलांडे •
मो. 7249683068
डॉ. भगवान शिंदे समोर, छत्रपती संभाजी महाराज चौक,धारणगांव रोड, कोपरगांव

दैनिक
# जनसंजीवनी
शुक्रवार दि.०७/०२/२०२५
मुंबई, पुणे, नाशिक अहमदनगर
विश्वास तुमचा, साथ आमची

95959 63838
श्री गणेश टायर रिमोल्ड
हॉट & कोल्ड
आमच्याकडे सर्व प्रकरचे टायर खात्रीशीर रिमोल्ड करून मिळेल
पत्ता - प्लॉट नंबर ए-१ कोपरगांव औद्योगिक सहकारी वसाहत सोसायटी लिमिटेड, स्टेशन रोड, कोपरगांव - ४२३६०१ जि. अहमदनगर, (महाराष्ट्र)

संस्थापक : मनीष एस.जाधव | ९८२३७५२९६४ | पाने : ४ | वर्ष ३ रे | अंक : ९३ | Gmail : editor.jansanjivani@gmail.com | किंमत ३.०० रूपये



सौजन्य : राजहंस ॲग्रीकल्चर ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि

## लोकनेते बाळासाहेब थोरात हे राजकारणातील संत-साहित्यिक कळमकर

### समाज परिवर्तनात शिक्षण क्षेत्राचे मोठे योगदान -बाळासाहेब थोरात
### सह्याद्री संस्थेत आजी-माजी सेवक व पालकांचा संवाद मेळावा संपन्न



संगमनेर दि.७ (प्रतिनिधी)- निवडणुकांमध्ये जय पराजय होत असतात. परंतु सातत्याने जनतेच्या विकासासाठी काम करणारे नेतृत्व हे जनतेच्या ह्रदयात असते. अत्यंत स्वच्छ प्रतिमा आणि प्रामाणिकपणे सातत्याने काम करणारे लोकनेते बाळासाहेब थोरात हे राजकारणातील संत असल्याचे गौरवदगार साहित्यिक संजय कळमकर यांनी काढले आहे.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालय येथे सह्याद्री संस्थेच्या आजी-माजी पदाधिकारी पालक व सेवकांच्या मेळाव्यात ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात, संस्थेचे चेअरमन मा.आ.डॉ.सुधीर तांबे, सौ दुर्गाताई तांबे, सेक्रेटरी लक्ष्मणराव कुटे,लहानु भाऊ पा. गुंजाळ, डॉ.सोमनाथ सातपुते, साहेबराव कवडे ,नानासाहेब गुंजाळ, सिताराम वरपे सह सेक्रेटरी दत्तात्रय चासकर रजिस्टर आचार्य बाबुराव गवांदे प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी वाढदिवसानिमित्त लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे केक कापून अभिष्टचिंतन करण्यात आले.

यावेळी बोलताना साहित्यिक कळमकर म्हणाले की, जनतेसाठी जीवन समर्पित करणारे नेते हे जनतेच्या ह्रदयात असतात. अहमदनगर जिल्ह्याचे सुपुत्र बाळासाहेब थोरात यांनी आपल्या कर्तुत्वाने राज्यात तालुक्याचे आणि जिल्ह्याचे नाव पोहोचविले. अत्यंत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पडताना त्या खात्यांना लोकाभिमुख बनवले. संगमनेर तालुका हा जिल्ह्यात नव्हे तर राज्यात विकसित बनवला. निवडणुकीचे पराजय होत असतात परंतु समाजासाठी झटणारे लोकनेते हे जनतेच्या ह्रदयात असतात.

याचबरोबर सध्याचे जीवन हे धावपळीचे झाले असून जुन्या काळामध्ये जी जवळीक होती ती आता सोशल मीडियाच्या जमान्यांमध्ये राहिली नाही. यावेळी जुने आणि नवीन यामधील अनेक फरक सांगताना त्यांनी सर्वांना खळखळून हसवले.

तर माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, शिक्षण हे समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. आपण शिक्षण मंत्री पदाच्या काळात या विभागातील अडचणी जवळून पाहिल्या आणि जास्तीत जास्त अडचणी सोडवल्या. याचबरोबर मूलभूत शिक्षणाचा अधिकार हा हक्क राबविला. आगामी काळातही शिक्षणातील अनेक प्रश्न सोडवण्यासाठी संघटितपणे आपल्याला काम करावे लागणार आहे. सह्याद्री संस्थेने गुणवत्तेने काम केल्यामुळे अनेक गुणवंत विद्यार्थी या ठिकाणी निर्माण झाली असून तालुक्याच्या शैक्षणिक वाटचालीत सह्याद्री संस्थेचे मोठे योगदान असल्याचे ते म्हणाले.

तर चेअरमन डॉ तांबे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमने हे शैक्षणिक केंद्र ठरले आहे. सह्याद्री संस्थेने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरता सातत्याने विविध उपक्रम राबवले आहेत. आगामी काळामध्ये शिक्षणातील नवीन प्रणालींबरोबर विविध कंपन्यांशी टाईप आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सह्याद्री कटिबद्ध असल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रजिस्टर बाबुराव गवांदे यांनी केले. तर प्राचार्य डॉ बाळासाहेब वाघ यांनी आभार मानले. याप्रसंगी सह्याद्री संस्थेतील आजी-माजी कर्मचारी व पदाधिकारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



















# ''जाणता राजा''

संसारी कितीक,असती नाती गोती
बहिणभाऊ, मोलाची माणिक मोती

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, सांस्कृतीक, सामाजिक,राजकीय चळवळीत जे अनेक परिवार पिढ्यान पिढया त्याच सातत्याने समाजात काम करतात त्यात थोरात पाटील हा एक नावाजलेला परिवार आहे पिढ्यान पिढया कष्टाळू वृत्ती, सर्वधर्म समभावाची वागणुक, नेतृत्व गुण, पुरोगामी विचार दूरदृष्टी, अध्यात्मिकता असे सर्व गुणसंपन्न असा हा परिवार आहे उत्तम नेतृत्व घडते त्याला अनेक गोष्टी कारणीभूत असतात नेतृत्व एक दिवसात घडत नाही.

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील '' जोर्वे '' हे एक ऐतिहासिक गाव. सह्याद्रीच्या कुशीत उगम पावणारी अमृतवाहिनी '' प्रवरा '' नदीच्या तीरावर वसलेले हे एक संपन्न गाव. नदीच्या काठावर प्रसिध्द एकमुखी दत्ताचे मंदिर, पुरातन काळातील कथा असलेले, सर्वांची श्रध्दा असलेलेधार्मिकस्थळ. ऐतिहासिक संस्कृती असणारे ''जोर्वे'' संस्कृती म्हणून दिल्लीच्या संग्रहालयात असणारे हे प्रसिद्ध गाव.

थोरात पाटील परिवाराची परंपराच वेगळीच. हे आमचे पंजोबा गंगाराम पाटील थोरात हे गावचे पाटील व पंजी मंजुळाबाई थोरात अर्थात गावची पाटलीण.त्यांचा गावात खुप दरारा. सगळंगाव त्यांना खूप घाबरे ह्या उभयतांचे व्यक्तीमत्वच तसे होते. सगळ्या गावाला सांभाळून घेणारे असे जबरदस्त दांपत्य. त्यांच्या ह्या अनेक पैलू असलेल्या वागण्यातूनच परिवार घडत गेला. पुढे माझे आजोबा संतुजी पाटील थोरात व आजी सिताबाई यांच्या पोटी सहा भावंड झाली. तीन मुले व तीन मुली, त्यातील माझे वडील स्व.भाऊसाहेब हे सर्वात थोरले. त्यानंतर पंडीतराव, मधुकर हे बंधु व भगिनी हिराबाई, मीराबाई व ताराबाई.माझे वडील स्व भाऊसाहेब थोरात यांनी वयाच्या १८ व्या वर्षापासुन ८६ व्या वर्षापर्यंत स्वांतत्र्याची चळवळ सहकाराची उभारणी, अनेक चळवळी यात अखंड ६८ वर्ष घालविली. हे सर्व करता करता कुटुंबातील कर्तव्यही पार पाडली.माझे वडील तिर्थरुप स्व.भाऊसाहेब थोरात व आई ति.मथुराबाई यांच्या पोटी ७ फेब्रुवारी १९५३ रोजी श्री.बाळासाहेबांचा जन्म संगमनेर खुर्द येथे आजोळी झाला. आम्ही चार बहिणी व आम्हा बहिणींचा सर्वांचा लाडका भाऊ. आम्ही बहिणी, भाऊ त्याला आदराने ''भाऊ''म्हणतो. पुढची पिढी त्याला ''आबा''म्हणते. ग्रामीण भागातील सर्व संस्कार भाऊंवर झाले. म्हणजे सर्व संस्कार मोठ्या माणसांच्या कृतीतूनच झाले. आमच्या कुटुंबात सर्वांना कष्टाची सवय, शेतीची कामे, स्वत:करण्याची पद्धतच होती. आमची आई ति.मथुराबाई दादांच्या कामाच्या व्यापामुळे संपूर्ण शेती सांभाळत. दादांना वेळ मिळेल तसे ते शेतात स्वत:राबत त्यामुळे बाळासाहेबही सर्व शेतीची कामे शिकले. ट्रॅक्टरने नांगरणी करणे, पेरणी, मोटारींच्या दुरुस्त्या, गायी म्हशींचे संगोपन इ. सर्व कामे तो स्वत: करत असे एकदा ते डिझेल इंजिन दुरुस्ती करतांनी एक भाग पायावर पडून पाय फ्रॅक्चर झाला होता.

आमच्या घरी आजोबांचे ''ग्रंथालय'' होते. त्यात स्वामी विवेकानंद चरित्र, भगवतगीता, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, सर्व धार्मिक ग्रंथ होते. नंतर दादांचेही वाचन खूप असल्याने त्यात अनेक चरित्र जगातील लढे, कम्युनिझमचे अनेक पुस्तके होती. त्यातूनच घरांत सर्वांनाच वाचनाची आवड निर्माण झाली. नंतर भाऊंची ही पुस्तक वाचन, संग्रह वाढतच गेला. वस्तीवर दादांनी शामची आई, बनगरवाडी इ पुस्तकांचे सामुदायिक वाचन ठेवले होते. दादांना स्वातंत्र्य चळवळीत डॉ.अण्णासाहेब शिंदे, ॲड. रावसाहेब शिंदे, ॲड. पी. बी. कडु पाटील, धर्माजी पोखरकर इ. सहका-यांसोबत सहवासामुळे तुरुंगातील वास्तव्यात सामुदायिक वाचनाची सवय लागली होती. वाचनाची तीच परंपरा आज पुढच्या पिढीतही चालुच आहे.

थोरात परिवारात जात-पात कधी मानली नाही. मुस्लीम समाजाची चाँदबीबी आई ही आमच्या कुटुंबातील सदस्यच होती. माझ्या आईचे व तिचे मायलेकीचे नाते होते. चांभार समाजाच्या वनाई, शांताबाई भोसले ह्या आईच्याजीवलगमैत्रिणी होत्या. चांभार समाजाच्या सावित्रीमामी आमच्याकडे स्वयंपाकाला होत्या. सावित्रीमामींना अतिशय स्वच्छतेची आवड.घरी सर्व आवरुन देवपुजी करुन स्वत:व्यवस्थितच मग स्वयंपाकाला येणार अशी सर्व धर्म समभावाची शिकवण कुटुंबात होती तसेच संस्कार भाऊंवर झाले.

अंधश्रध्दा तर कधीच मानली नाही. प्रवरा नदिच्या कडेला आमचे गु-हाळ चाले. एक दिवस सर्व भावंडांनी भाऊला सातवीत असतांना अमावस्येच्या रात्री गु-हाळात गुळ घेऊन येण्याचीपैंज लावली.भाऊ अंधारात एवढ्या रात्री एकटा जाऊन गुळ घेऊन आला. आम्ही सर्व बहिणी नगरला,पुण्याला वसतिगृहात शिकत असतांनी आम्हाला वसतिगृहात सोडणे, आणणेसर्व भाऊच करी. कारण दादांना ह्या सहकाराच्या उभारणीमुळे वेळ मिळत नसे. उन्हाळ्याच्या, दिवाळीच्या सुट्यां भाच्यांनापिकनिकला नेणे, त्यांचे लाड करणे. आम्हा बहीणींना सासरी सोडणे, माहेरी आणणेआम्हाला मनपसंद साड्या आणणे. कुटुंबातील अनेक जबाबदा-या त्याने लहानवयापासुनच सांभाळल्या.

पुढे कॉलेजला संगमनेर व नंतर पुण्याला गेला. तेथून पुढे महाराष्ट्रातील मोठा मित्र परिवार मिळाला. पाणी पंचायतमधुन पाणी प्रश्नावंर आंदोलन केले. परीक्षा फी माफी, विडीकामगारांचे प्रश्नांवरील आंदोलनाचे नेतृत्व केले.१९८० साली विडी कामगारांच्या प्रश्नांच्या आंदोलनात ९ दिवस कारावास झाला.मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीत ही भाग घेतला.हे काम करता करता सहकाराची सुरुवात जोर्वे दुध उत्पादक संस्थेची स्थापना करुन केली.१९८५ साली जनतेच्या प्रेमामुळेच अपक्ष आमदार म्हणुन निवडुन आला.सर्वात कमी वयाचा आमदार म्हणुन विधानसभेत बसण्याची संधी मिळाली.

हरितक्रांती व श्वेतक्रांतीचे प्रणेते आमचे मामा डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्या सहवासाचा भाऊंना फायदा झाला.स्व.अण्णासाहेबां बरोबरपरदेशदौरे करण्याची संधी मिळाली. भाऊंच्या जीवनात स्व.यशवंतराव चव्हाण, स्व.वसंतदादा पाटील, स्व. इंदिरा गांधी, स्व.राजीव गांधी यांसारख्या खुप मोठ्या माणसांचा सहवास मिळाला व त्यातून व्यक्तिमत्व घडत गेले. जोर्वेच्या घरी मोठे ग्रंथालय होते. आजोबा, वडील सर्वांनाच वाचनाची आवड. तशीच आवड भाऊंनाही खूप आहे. वाचनाने विचारात समृध्दता येत गेली. स्व.दादांची साधी रहाणी व उच्च विचार सरणी नुसार भाऊंमध्ये साधेपणा, व विचारात उच्चपणा आहे. बोलण्यात मितभाषी आहेत. वकृत्व अतिशय सुंदर आहे. माणसे ओळखण्याचा एक सुप्तगुण त्यांच्यात आहे. त्यांनी कधीही राजकारणात कोणाचे पाय ओढण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. वरवर गोडबोलणे, गळ्यात पडणे व खालून मात्र पाय घालून पाडणे ही वाईट वृत्ती त्यांच्यात नाही. जे बोलायचे ते स्पष्ट बोलायचे. चुकत असेल तर तोंडावर स्पष्ट बोलतात.

आज ह्या पक्षात तर उद्या त्या पक्षात अशी धरसोड वृत्तीही नाही. भाऊ शांत, संयमी, स्थितप्रज्ञ वृत्तीचा आहे. पद असो-नसो शांतपणे कामकाज करणारा, साधेपणाजपणारा, माणसांना जीव लावणारा असे व्यक्तीमत्व सर्वांना प्रिय झाले. म्हणुनच प्रचंड लोकप्रियता मिळावी. त्यांच्या अशा व्यक्तीमत्वामुळेकाँग्रेस पक्षाच्या जेष्ठ नेत्यांचा आवडता आहे. अशा व्यक्तीमत्वामुळे १९९९ साली राज्यमंत्री पद मिळाले तर आजपर्यंत २०१३ पर्यंतचे महसूलमंत्री पदापर्यंत वेगवेगळे खाते सांभाळतांना त्यांच्यातील अनेक गुण वैशिष्टांचे पैलु आपल्याला दिसले.संपुर्ण महाराष्ट्राचे नेतृत्व करतांना दिल्लीत सुध्दा त्याला सतत मानानेच ओळखले जाते. एवढा मंत्रीपदाचा, राज्याचा व्याप, मतदारसंघातील कामे संभाळत असतांनी त्याने दादांच्या जाण्यानंतर सहकारातील व्यवस्थापन अतिशय उत्तम ठेवले. सध्या संपूर्ण भारताला दिशादर्शक असलेला सहकार त्यांच्या बारीक नजर,दुरदृष्टी,उत्तम व्यवस्थापनातुन उभा आहे.

महाराष्ट्रभरच्या दौऱ्यात तो कधीच बोलण्याचा अतिरेक करत नाही. ज्या लोकांच्या सहकारी संस्था मोडल्या, मोडकळीस आल्यात तेच महाराष्ट्रभर भाषणे करत फिरतात. ''सहकार टिकला पाहीजे''. पण आमचे भाऊ इथला अति उत्तम चालणारा सहकार असूनही अहंकाराने कधीही बोलत नाही. खरतर सहकार टिकला पाहीजे असे आज अधिकारवाणीने फक्त तोच सांगु शकतो. आज इथला सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना हा ११ लाख मेट्रीक टनापर्यंत गाळपक्षमता असलेला कारखाना आहे. साखर उतारा ११.८० म्हणजे महाराष्ट्रात वरच्या क्रमांकावर आहे. तांत्रिक कार्यक्षमता, उर्जा बचतीचे अनेक पारितोषिके कारखान्याने मिळविलेले आहे. उसाच्या मळीपासून डिस्टीलरीप्लॅन्ट चालू आहेत. दारुचा परवाना मिळत असूनही ति. दादांनी समाजिक नैतिकतेची जाणीव ठेवून इंडस्ट्रीअल अल्कोहोल तयार करण्याचा ठाम निर्णय घेतल्यामुळे इथे इंडस्ट्रिअल अल्कोहोलच बनविले जाते. आज कारखाना महाराष्ट्रात सर्वाधिक भाव देणारा, कर्मचाऱ्यांचे पगार, बोनस वेळेवर देणारा कारखाना म्हणून ओळखला जातो. याचे सर्व श्रेय दादांच्या कृतीतून घडलेल्या भाऊंनाच दिले जाते. आताच्या निवडणूकीत पराभव झाला पण ते ''स्थितप्रज्ञ'' स्वभावाचे आहेत. त्यामुळे त्यांनी कोणतीच प्रतिक्रीया दिली नाही.

आज महाराष्ट्रातील सर्व शेतकी संघ बंद पडलेले आहेत. फक्त संगमनेरचाच शेतकीसंघ उत्तमप्रकारे चालू आहे. संगमनेर तालुका दूध संघ महाराष्ट्रातील एक नंबरचा तालुका पातळीवरचा दुध संघ आहे. रोजचे दुध संकलन सरासरी ३ लाख ४ हजार लिटरपर्यंत आहे. ''राजहंस'' नावाने संपूर्ण महाराष्ट्रात व राज्याबाहेर, गुजरात, कर्नाटकमध्ये २ लाख ४५ हजार पाऊच खपतात. दुधाचे विविध दुग्धजन्य पदार्थ तुप, दही, श्रीखंड, ताक, लस्सी, पेढे, गुलाबजाम, चीज, पनीर, ही लोकप्रिय आहेत. ''राजहंस'' पाणी ही लोकप्रिय आहे. तालुक्यात कोट्यावधी रुपायांची उलाढाल सहकारामुळेच होतो. त्यामुळे तालुक्यात सुबत्ता, संपन्नता आहे. तालुक्यात पॉलीटेक्नीक, अमृतवाहिनी इंजिनिअरींग, डेंटल कॉलेज, फार्मसी कॉलेज, तसेच मुकबधीर व मतीमंद विद्यालय, आदिवासी आश्रमशाळा व तालुक्यात २१ हायस्कुल २ प्राथमिक स्कुल, १० ज्युनिअर कॉलेज, २ सिनिअर कॉलेज, अमृतवाहिनी मॉडेल स्कुल व सी.बी.एससी. स्कुल उभे आहे. त्याकडे भाऊचे दुरदृष्टीने वाढविण्याचा विचार चालूच असतो. कृषी महविद्यालय सुध्दा सुरु केले आहे. त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची आवड आहे. आता नवीनच आलेले. तंत्रज्ञान अवगत केले ते स्वत: अष्टपैलु व्यक्तिमत्व आहे.त्यांची निर्णय शक्ती उत्तम आहे. जगातील नवनवीन गोष्टींचा त्यांना अभ्यास आहे.

हे सर्व करत असतांनी राज्यातील कामाचा व्याप, सहकार, शैक्षणिक संकुल सांभाळत असतांनी ते पर्यावरणाचाही खुप विचार करतात. त्यामुळे दादांनी सुरु केलेली ''दंडकारण्याची '' चळवळ वृक्षरोपणाकडे ही त्यांचे खुप लक्ष असते. मी दादांना म्हणायचे दादा आम्ही किती भाग्यवान तुम्ही सर्व कामे उभी केली. त्यामुळे पुढे आम्हाला नेतृत्व करायला मिळते. भाऊ किती भाग्यवान त्याला महाराष्ट्राचे नेतृत्व करायला मिळते. पण दादा म्हणायचे बाळासाहेब कर्तृत्ववान मुलगा आहे. म्हणून तो हे सगळ व्यवस्थित सांभाळतो.

अशा या आमच्या लाडक्या बंधुराजा साठी आम्ही बहिणी एवढेच म्हणतो की,

''चवधी आम्ही बहिणी, योकच भाऊराया''
झाकुनी गेल्या, मोगऱ्याखाली काया ।।१।।
बहिण भावंडाची माया, अंतर काळजाची
पिकल सिताफळ, त्याला गोडाई साखरेची ।।२।।
माहेरीच्या देवा, नाही तुला मी विसरत
पाठीचा बंधुजीचा, वेल जावु दे पसरत ।।३।।
माझ्या या आयुष्याची देवा, आखुड घालदोरी
हौशी बांधवाला माझ्या, घाल शंभर पुरी ।।४।।

– दुर्गा सुधीर तांबे

# राजकारणातील देवमाणूस राजकारणातील राजहंस

महाराष्ट्र ही संतांची, शूरवीरांची आणि समाजसुधारकांची भूमी आहे. देशाला विचारातून आणि कृतीतून दिशा देणाऱ्या महाराष्ट्रात राजकारणामध्ये स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचा सुसंस्कृत राजकारणाचा वारसा जपणारे सध्याच्या राजकारणातील सर्वांना सोबत घेऊन गोरगरिबांच्या विकासासाठी अविरत काम करणारे लोकनेते बाळासाहेब थोरात हे महाराष्ट्राच्या समाजकारण आणि राजकारणातील राजहंस व्यक्तिमत्व असून सामान्य माणसांसाठी देवमाणूस आहेत.




राजकारण हे कधीही सत्तेसाठी नव्हे तर गोरगरिबांच्या कल्याणासाठी तत्त्वांनी करायचे असते. हा सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांचा विचार घेऊन लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी महाराष्ट्राच्या राजकारण आणि समाजकारणात मोठे योगदान दिले आहे. दर पंचवार्षिकला नवे नेते येतात आणि जातात. मात्र प्रत्येकाच्या हृदयात स्थान निर्माण करणारे मोजके नेते असतात. त्यामध्ये सुसंस्कृत व्यक्तिमत्व असलेले लोकनेते बाळासाहेब थोरात यांचा वरचा क्रमांक लागतो.

१९८५ मध्ये खास जनतेच्या आग्रहास्तव लोकनेते बाळासाहेब थोरात हे राजकारणात आले. पाणी प्रश्नासाठी त्यांनी मोठे आंदोलन उभारले .आणि यातूनच १९८९ मध्ये अकोले आणि संगमनेर तालुक्याला प्रवरा नदीवरील ३० टक्के हक्काचे पाणी मिळाले .यासाठी मोठा संघर्ष त्यांनी केला. पाण्याबरोबर समृद्ध शेती निर्माण करण्यासाठी सहकाराच्या माध्यमातून पाईपलाईनचे जाळे निर्माण केले. दुग्ध व्यवसाय वाढीसाठी गावोगावातून सोसायटी निर्माण करून संगमनेर तालुका दूध उत्पादनात राज्यात अग्रेसर बनवला आज संगमनेर तालुक्यामधून दररोज ९.५ लाख लिटर दूध उत्पादन होत आहे ते फक्त थोरात साहेबांच्या परिश्रमामुळे.

सहकार, शिक्षण, कृषी, ग्रामीण विकास या मूलभूत क्षेत्रांमध्ये सातत्याने रचनात्मक काम करताना संगमनेरच्या सहकाराने लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली देशाला दिशा दिली. गुणवत्ता पूर्ण कामामुळे थोरात सहकारी साखर कारखाना ,राजहंस दूध संघ ,अमृतवाहिनी शिक्षण संस्था, अमृतवाहिनी बँक ,शेतकी संघ ,सह्याद्री शिक्षण, नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा बँक या संस्था यांसह सर्व संस्थांनी राष्ट्रीय पातळीवर विविध मानांकने मिळवले. नागरिक, सभासद, जनता यांचा मोठा विश्वास संपादन करताना या संस्थांच्या माध्यमातून संगमनेरची बाजारपेठ फुलली.

आज संगमनेर हे राज्यातील सर्वात सुकून असलेले वैभवशाली शहर आहे. यामध्ये हायटेक बसस्थानक ,प्रांताधिकारी कार्यालय, न्यायालय इमारत, तहसील कार्यालय, कवी आनंद फांदी नाट्यगृह, नगरपालिका कार्यालय पंचायत समिती, बायपास या अद्यावत कार्यालयांबरोबरच संगमनेर शहरासाठी २४ तास स्वच्छ व मुबलक पाणीपुरवठा करणारी थेट निळवंडे पाईपलाईन योजना लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी राबवली. राज्यामध्ये पाण्याचा तुटवडा असताना संगमनेर मध्ये मात्र सर्वांना दररोज स्वच्छ आणि मुबलक पाणी मिळत आहे. ते तत्कालीन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या दूरदृष्टीमुळेच.

अहमदनगर जिल्ह्यासाठी वरदान ठरणारे निळवंडे धरण व कालव्यांची निर्मिती हा लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी पुढील पन्नास पिढ्यांसाठी उभे केलेले ऐतिहासिक काम. १९९९ मध्ये राज्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर निळवंडे धरणासाठी रात्रंदिवस पाठपुरावा करणारे माजी मंत्री थोरात यांच्या प्रयत्नातूनच डावा आणि उजवा कालवा पूर्ण झाला. चार जून २०२३ रोजी या कालव्याचे पाणी संगमनेर तालुक्यात आले .आणि सर्वत्र आनंद उत्सव झाला. आज हे पाणी दुष्काळी शेतकऱ्यांच्या शेतामध्ये आले आहे अनेक जण श्रेय घेण्याचा प्रयत्न करतो. परंतु खरे काम हे जलनायक बाळासाहेब थोरात यांनीच केले आहे. हे पूर्ण श्रेय त्यांचेच असल्याचे संगमनेर तालुका अहमदनगर जिल्हा व महाराष्ट्र जाणतो आहे.

राज्यात महसूल मंत्री, कृषिमंत्री, शिक्षण मंत्री, रोहयो मंत्री, राजशिष्टाचार मंत्री, ऊर्जामंत्री, जलसंधारण मंत्री अशा विविध महत्त्वाच्या खात्याची जबाबदारी सांभाळताना त्यांनी अत्यंत लोकाभिमुख काम केले .आणि म्हणून चांदा ते बांदा आदराचे स्थान त्यांनी निर्माण केले. विकासाबरोबर समाजकारण, कला, क्रीडा , शिक्षण या सर्व क्षेत्रात मोलाचे योगदान असणारे तत्कालीन मंत्री बाळासाहेब थोरात यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या सुसंस्कृत राजकारणाचा वारसा जपला आणि म्हणून साहित्य आणि कला क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचा आवर्जून राज्याचे सुसंस्कृत भावी नेतृत्व म्हणून उल्लेख केला.

पक्षनिष्ठ जनतेशी, स्वच्छ व प्रामाणिक नेतृत्व, जनतेचे प्रेम, सहकाऱ्यांचा विश्वास यामुळे काँग्रेसचे सर्वाधिक यशस्वी प्रदेशाध्यक्ष व विधिमंडळ गटनेते म्हणून त्यांनी काम केले. लोकनेते बाळासाहेब थोरात यांना राष्ट्रीय पातळीवर अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटी मध्ये पहिल्या २१ महत्त्वाच्या नेत्यांमध्ये स्थान मिळाले. याबाबत अत्यंत नम्रतापूर्वक लोकनेते बाळासाहेब थोरात सांगतात की हा जनतेच्या प्रेमाचा आदर आणि नेतृत्वाचा विश्वास यांचा संगम आहे.राज्यात काम करताना संगमनेर तालुक्याच्या गावागावात विकासाची मोठमोठी कामे त्यांनी उभी केली, देवकौठे ते बोटा असे १०० किलोमीटर विस्तीर्ण असलेल्या संगमनेर तालुक्यात कार्यकर्त्यांची मोठी फळी उभी केली. सलग आठ वेळा ५० हजार पेक्षा जास्त मतांनी विजय होण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. जिल्ह्यामध्ये सहकारातील विविध संस्थांमध्ये लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे नेतृत्व मान्य आहे.

२०२४ च्या आणीबाणीच्या लढाईमध्ये लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत प्रचाराची संपूर्ण धुरा त्यांनी सांभाळली. महाविकास आघाडी करून मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून लोकनेते बाळासाहेब थोरात पुढे आले. परंतु ईव्हीएम ने घात केला आणि अन संगमनेरच्या अनपेक्षित निकालाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. सर्वसामान्य जनता धाय मोकलून रडली. अनेकांच्या विजयापेक्षा लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या पराभवाची चर्चा जास्त झाली .विरोधी पक्ष आणि सत्ताधारी या सर्वांमध्ये चर्चा झाली. राज्य व राष्ट्रीय पातळीवर संगमनेरचा निकालाबाबत असे होणे हे होणे शक्य नाही यावर विचार मंथन झाले. आणि हा निकाल अनाकलनीय आहे .म्हणून सर्व क्षेत्र पाहू लागले. पत्रकारिता ,साहित्य ,कला, शेती आणि तरुणाई मध्ये सुद्धा या निकालाबद्दल चिंता मोठी निर्माण झाली.

प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू होते. महाराष्ट्र हळहळला होता. परंतु आपल्या जनतेने आपल्यावर खूप प्रेम केले आहे .आणि म्हणून स्वातंत्र्यसैनिकांचा मुलगा असलेले लोकनेते बाळासाहेब थोरात जनतेला सावरण्यासाठी पुढे आले. अनपेक्षित आहे. परंतु पुन्हा एकदा आपल्याला कामाला लागायचे आहे असे म्हणून सर्वांना धीर दिला. संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येकाच्या स्टेटसवर फक्त आणि फक्त लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्याकरता माणसा उधळीन जीव तुझ्या पायी हे गीत झळकले. तसे माय बहिणींच्या डोळ्यातील अश्रू तरळले.

हा महाराष्ट्र आणि संगमनेर तालुका आहे पुन्हा एकदा जोमाने पुढे जाणार आहे. जीवाला जीव देणारी माणसं जोडणाऱ्या लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या करता आज प्रत्येक जण जीव ओवाळून टाकत आहे .आणि टाकणार सुद्धा आहे. हीच साहेबांची मोठी संपत्ती आहे. केलेले काम जपलेली माणसं याच बळावर पुन्हा एकदा महाराष्ट्रामध्ये लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे नाव प्रत्येकाच्या पुढे असणार आहे. किंबहुना संपूर्ण राज्याला पुन्हा एकदा स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचा सुसंस्कृत वारसा जपणाऱ्या लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाची गरज आहे.

गरज आहे ती देव माणसाची,
गरज आहे ती राजकारणातील राजहंसाची,
गरज आहे ती समाजकारणातील संताची.

आणि म्हणून प्रत्येकाच्या हृदयात स्थान असलेले लोकनेते बाळासाहेब थोरात या आमच्या दैवतास वाढदिवसानिमित्त तमाम जनतेच्या वतीने व अमृत उद्योग समूहाच्या वतीने कोटी कोटी शुभेच्छा

**– नामदेव कहांडळ**
**जनसंपर्क अधिकारी, अमृत उद्योग**

**समूह**

# सर्वांगीण विकासाचे आर्किटेक्ट लोकनेते बाळासाहेब थोरात

महाराष्ट्र ही संत व विचारवंतांची भूमी आहे. देशाच्या राजकारणाला महाराष्ट्राने कायम दिशा दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराज , फुले - शाहू - आंबेडकरांचा वारसा सांगणार्या या भूमित स्व.यशवंतरावजी चव्हाण यांनी कृषी-औद्योगिक क्रांतीचा पाया घालून विकसित महाराष्ट्र निर्माण केला. याच विचारांचा वारसा घेऊन राज्यात कार्यरत असलेले काँग्रेसचे मा. प्रदेशाध्यक्ष व मा.महसूलमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात हे सर्वसामान्य जनतेचे खऱ्या अर्थाने आश्वासक व महाराष्ट्राचे राजहंस नेतृत्व ठरले असून सर्वांगीण विकासाचे आर्किटेक्ट आहे.



स्वातंत्र्यसैनिक सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात व हरितक्रांतीचे प्रणेते डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन १९८५ साली बाळासाहेब थोरात यांनी सर्वात कमी वयाचे लोकप्रतिनिधी म्हणून आपल्या कार्यकर्तृत्वाला सुरुवात केली. पाण्यासाठी आग्रह धरताना भंडारदर्याच्या पाण्यावर संगमनेर ,अकोले तालुक्याला १९८९ मध्ये ३० टक्के हक्क मिळवून दिला. याच काळात गावोगावी दूध संस्थांची निर्मिती करून संगमनेर तालुका हा दुग्ध व्यवसायात अग्रेसर बनवला. तसेच गावोगावी पाणीपुरवठा योजनांचे जाळे ही निर्माण केले. दुष्काळी भागाकरिता निळवंडे धरणाचा ध्यास घेतलेल्या ना.थोरात यांना १९९९ मध्ये राज्य मंत्रिमंडळातील पहिली संधी मिळाल्यानंतर त्यांना अपेक्षित असलेले कॅबिनेट मंत्रीपद न मागता निळवंडे धरणाकरिता पाटबंधारे खात्याचे राज्यमंत्री पद घेतल.

अगदी पहिल्याच दिवशी निळवंडे च्या कामाची फाईल हाती घेऊन अनेक दिवस रेंगाळलेले निळवंडे खर्या अर्थाने १९९९ मध्ये कार्यान्वित केले. अनेक अडचणीवर मात करुन आधी पुनर्वसन , मग धरण हा आदर्शवत प्रकल्प राबविला. अनेक अडचणींवर मात करुन निळवंडे धरणाचे काम २०१२ पर्यंत पूर्ण केले. याच काळात प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवताना कवठे कमळेश्वर , पिंपळगाव कोंझिरा, गणेश वाडी येथील मोठ मोठे बोगदे ही मार्गी लावताना कालव्यांची कामे सुरू ठेवली. यासोबत संगमनेर शहरासाठी थेट पाईपलाईनची ऐतिहासिक योजना पुर्ण केली. संगमनेर शहरात हायटेक बस स्थानक, तहसील कार्यालय, प्रांत कार्यालय, नगरपालिका, कवी अनंत फंदी नाट्यगृह, कोर्ट, पंचायत समिती यांसह अनेक वैभशाली इमारती उभारल्या.

समृद्ध सहकाराबरोबर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी गावोगावी रस्ते, इमारती, जलसिंचन योजना, सिमेंट बंधारे , दवाखाने , शाळा, विविध सभामंडप असे अनेक विकास कामे सातत्याने राबवली. सकाळी सात ते रात्री अकरापर्यंत अविश्रांत काम करताना लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुक्यातून सलग आठ वेळेस विक्रमी मताधिक्याने विजयी होण्याचा मान मिळवला.

संपूर्ण राजकीय कारकिर्दीमध्ये प्रत्येक कामाला गती देत त्यांनी पारदर्शकपणे काम केले. शेतकरी , गोरगरीब , कष्टकरी , कामगार यांच्यासाठी सातत्याने विविध योजना प्रभावीपणे राबविल्या. मंत्रिमंडळात महसूल , कृषी , शालेय शिक्षण, रोजगार हमी ,पाटबंधारे अशी महत्वाची खाते भूषवताना या खात्यांना लोकाभिमुख व पारदर्शक बनवले. त्यांच्या कामाचा आवाका मोठा असल्याने पक्षाला मोठा जनाधार मिळवून दिला. काँग्रेस पक्षाची प्रामाणिकता व एकनिष्ठता यासंह सर्व कामांची दखल घेत केंद्रीय नेतृत्वाने कायम त्यांच्यावर जबाबदारी दिल्या.

ही जबाबदारी त्यांनी सक्षमपणे पार पाडली. याचबरोबर गुजरातचे हिमाचल प्रदेश निरीक्षक म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्रातील सर्वसामान्यांचे नेतृत्व म्हणून श्रीमती सोनिया गांधी यांनी मार्च २०१८ मध्ये काँग्रेसच्या अतिमहत्वाच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटी वर कायमस्वरूपी सदस्य म्हणून निवड केले आणि त्यांचे नेतृत्व अधोरेखित झाले.पुढे पक्षाला उभारी देण्याबरोबर विविध निवडणुकांमध्ये त्यांचा सहभाग महत्त्वपूर्ण राहिला २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेसची पीछेहाट झाली. अशातच अनेक जण पक्षांतर करू लागले. आणि या अडचणीच्या काळात काँग्रेसच्या अध्यक्षांनी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या वर प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. स्वातंत्र्यसैनिकांचे चिरंजीव असलेले बाळासाहेब थोरात यांनी ही जबाबदारी स्वीकारली. अडचणीत असताना पळायचे नसते तर लढायचे असते हे सांगून सर्व काँग्रेसजनांना प्रोत्साहित केले.

पक्षाला पराभवाच्या मानसिकतेतून बाहेर काढले आणि विधानसभेमध्ये काँग्रेसचे दमदार आगमन झाले. काँग्रेस - राष्ट्रवादी व शिवसेनेचे महाविकास आघाडी होवून राज्यात नवीन सरकार स्थापन झाले. मंत्रिमंडळात महत्त्वाचे महसूलमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळताना पक्षप्रमुख आणि महत्त्वाचे मंत्री अशी दोन्ही जबाबदारी त्यांनी सक्षम पणे पार पाडली .

२०२० मध्ये कोरोना संकटाने जगासह भारत देश ठप्प झाला. लॉकडाऊन मुळे अनेकांचे स्थलांतर होवू लागले.अशा अडचणीच्या काळात कोरोनाचा सामना करतांना दररोज १८ तास काम करुन लोकनेते थोरात यांनी शर्थीने महसूल विभाग व प्रशासनाचे नेतृत्व केले. कोरोना पाठोपाठ चक्रीवादळ,अतिवृष्टी यामध्ये शेतकरी व नागरिकांना दिलासा दिला.यामुळे राज्यातील शेतकरी, कष्टकरी ,गोरगरीब त्यांच्याकडे आशेने पाहतो आहे. सहकार, शिक्षण ,कृषी, ग्रामीण विकास अशा विविध क्षेत्रामध्ये नामदार थोरात यांचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी व ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी यांचे जीवन समृद्ध होण्यासाठी लोकनेते थोरात यांचे नेतृत्व सर्वांसाठी आश्वासन ठरत आहे.

**– मा.आ.डॉ.सुधीर तांबे**

# प्रतिष्ठित अशा सीएसआर हिरोज पुरस्काराने प्रा.डॉ.संजय बी चोरडिया सन्मानित

पुणे दि.७ (प्रतिनिधी)- सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन आणि बन्सी रत्न चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक व अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांना नुकताच महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या शुभ हस्ते प्रतिष्ठित अशा सीएसआर हिरोज अवार्ड २०२५ ने सन्मानित करण्यात आले. दि. ४ फेब्रुवारी रोजी मुंबईच्या परळमधील आयटीसी ग्रँड सेंट्रलमध्ये पार पडलेल्या एका शानदार समारंभात हा पुरस्कार प्रा. डॉ. चोरडिया यांना प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाला मेघश्रेय फाउंडेशनच्या संस्थापक आणि विश्वस्त आणि अल्केम लॅबचे प्रवर्तक सीमा सिंग, बजाज फाउंडेशनचे चेअरमन शिशीर बजाज,निमिष माहेश्वरी , सूर्यदत्त ग्रुपच्या उपाध्यक्ष सुषमा चोरडिया यांच्यासह विविध मान्यवरांची या कार्यक्रमाला उपस्थिती लाभली. सीएसआरमधून विविध प्रकारचे सामाजिक कार्य करणा-या कंपन्यांचे संचालक, संस्था व वेगवेगळ्या माध्यमातून समाजाच्या उन्नतीसाठी योगदान देणा-या परोपकारी, दानशूर व्यक्तींचा या कार्यक्रमात राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने सचिन तेंडुलकर फाउंडेशनच्या संचालिका सारा तेंडुलकर, जेएसडब्ल्यू फाउंडेशन, पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स, एल अन्ड टी ग्रुप, टाटा मोटर्स, एसबीआय फाउंडेशन, डा. डी. वाय. पाटील ग्रुप, क्राम्प्टन अन्ड ग्रीव्हज, ग्रँट मेडिकल फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी या वेळी राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार स्वीकार केले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया हे गेल्या अनेक वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत सक्रियपणे कार्यरत असून, जात, धर्म, आर्थिक-भौगोलिक परिस्थिती तसेच लिंग विचारात न घेता समाजातील जास्तीत जास्त घटकांपर्यंत सर्व प्रकारचे शिक्षण पोहोचावे, या दृष्टीने ते प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या प्रेरणेतून अनेक जणांना उच्चशिक्षण घेण्यास प्रेरणा प्राप्त झाली आहे. त्यांच्या प्रोत्साहन व प्रेरणेमुळे विविध प्रकारच्या व्यवसायात कार्यरत २५०० पेक्षा अधिक जणांना शिक्षण क्षेत्रासाठी प्रायोजकत्व प्राप्त झालेले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन आजवर त्यांना विविध प्रकारच्या पुरस्कारांनी सन्मानितदेखील करण्यात आलेले आहे. याशिवाय अनेक गरजू व पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण प्रदान करणे, यासह शिक्षण घेऊ इच्छिणा-या महिला, रेलवे कुली, आटोरिक्षा चालक अशा ५०० हून अधिक जणांना प्रा. चोरडिया यांच्यामुळे शैक्षणिक प्रोत्साहन मिळाले आहे . तसेच दुर्गम व ग्रामीण भागातील ५०० हुन अधिक विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले आहे . विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिरे तसेच शैक्षणिक महत्व समजावून सांगणारी शिबिरे, वैद्यकीय शिबिरे, सामाजिक जागृती शिबिरे आणि विविध प्रकल्पदेखील त्यांनी राबवले आहेत.फूड बँक, क्लोदिंग बँक, नॉलेज बँक, ब्लड बँक उत्पादन यांच्या माध्यमातून सामाजिक कारणासाठी काम करणे. इनक्यूबेटिंग स्टार्टअप इ. त्याद्वारे परिवर्तनात्मक बदल घडवून आणतात.



**सीमा सिंग, संस्थापक आणि विश्वस्त, मेघश्री फाउंडेशन आणि अल्केम लॅबचे प्रवर्तक, महाराष्ट्राचे राज्यपाल माननीय सी पी राधाकृष्णन,निमिष माहेश्वरी प्रा.डॉ.संजय बी चोरडिया संस्थापक व अध्यक्ष सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन आणि बन्सी-रत्न चॅरिटेबल ट्रस्ट यांचा हिरोज अवॉर्ड-२०२५ ने सन्मानित करताना, सुषमा चोरडिया अध्यक्ष** SWEL A, **शिशिर बजाज अध्यक्ष बजाज फाऊंडेशन,** ITC **ग्रँड सेंट्रल, परळ मुंबई**

## मणिपाल हॉस्पिटल बाणेर तर्फे कॅन्सरचे लवकर निदान करण्यासाठी प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजी क्लिनिकची सुरुवात

पुणे दि.६ (प्रतिनिधी)- कॅन्सरचा प्रतिबंध आणि लवकर निदान करण्याच्या दिशेने एक वेगवान पाऊल टाकत, बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल तर्फे जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजी क्लिनिक ची सुरुवात केली आहे. या क्लिनिक च्या माध्यमातून लोकांना आता वेळेत स्क्रीनिंग, जीवनशैली विषयी मार्गदर्शन आणि धोक्याची गणना करुन लवकरच्या टप्प्यातील सुधारीत उपचार प्राप्त होऊ शकणार आहेत. या वर्षीचा विषय 'युनायटेड बाय युनिक' ला अनुसरुन या उपक्रमाच्या माध्यमातून वैयक्तिक, तंत्रज्ञानावर आधारीत उपचार हे प्रत्येक रुग्णाच्या गरजेनुसार तयार करण्यात येणार आहेत.

या क्लिनिकचे उद्घाटन डॉ. मुक्ता पुणतांबेकर यांच्या हस्ते करण्यात आले आणि त्यांनी कॅन्सर रुग्णांच्या प्रवासातील कॅन्सरच्या लवकर निदानाचे महत्त्व आधोरेखित केले. त्यांच्या सह डॉ. अमीत पारसनीस, डॉ. लखन कश्यप आणि डॉ. करण चंचलानी यांनी अत्याधुनिक निदान पध्दती आणि प्रतिबंधात्मक योजनां बद्दलची माहिती दिली. या कार्यक्रमाला विविध पाहूणे, रुग्ण आणि काळजी वाहम उपस्थित होते, यामुळे मणिपाल हॉस्पिटलच्या समाजाप्रती कॅन्सरवरील उपचार सहज आणि प्रतिबंधात्मक पध्दतीने उपलब्ध करुन देण्याची वचनबध्दता अधोरेखित होते.

या सुरुवाती विषयी बोलतांना मणिपाल हॉस्पिटल्स चे क्लस्टर डायरेक्टर श्री. आनंद मोटे यांनी सांगितले '' कॅन्सर चा प्रतिबंध करण्याचा प्रवास हा योग्य ज्ञान आणि वेळेत उपचार केल्याने सुरु होतो. या क्लिनिक मुळे आम्ही प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या धोक्या विषयी सांगून जीवनशैलीतील योग्य बदल समजावून त्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी संरचनात्मक पाऊले उचलण्यावर भर देणार आहोत.''

आरोग्य क्षेत्रातील एक आघाडीचे असलेले मणिपाल हॉस्पिटल्स हे भारतातील सर्वांत मोठ्या हॉस्पिटल नेटवर्क्स पैकी एक असून ते वर्षाला ७ दशलक्षां हून अधिक रूग्णांना सेवा प्रदान करतात. परवडणार्या दरात, उच्च गुणवत्तेची आरोग्य सेवा मल्टी स्पेशॅलिटी आणि टर्शरी केअर देण्याच्या क्षेत्रासह ते आऊट ऑफ हॉस्पिटल केअर क्षेत्रातही कार्यरत आहे. भारतातील मडिका सिनर्जी हॉस्पिटल्स आणि एएमआरआय हॉस्पिटल्स लिमिटेड (सप्टेंबर २०२३ मध्ये अधिग्रहण) चे अधिग्रहण केल्यानंतर आजमितीस संपूर्ण भारतात मणिपाल हॉस्पिटल्स कडून १९ शहरांतील ३७ हॉस्पिटल्स च्या माध्यमातून १०,५०० हून अधिक खाटांचे व्यवस्थापन, ५,६०० हून अधिक कुशल डॉक्टर्स आणि १८,६००हून अधिक कर्मचारी यांचे नेटवर्क निर्माण झाले आहे.

## लठ्ठपणा असलेल्या ५ पैकी २ भारतीयांना उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्ट्रॉल आणि मधुमेहाचे निदान झाले आहे, असे आशिया-पॅसिफिक अभ्यासातून दिसून आले आहे

पुणे दि.६ (प्रतिनिधी)- नोव्हो नॉर्डिस्कने केलेल्या अलिकडच्या अभ्यासात, लठ्ठपणा असलेल्या २००० हून अधिक लोक आणि ३०० वैद्य यांचा समावेश होता, आणि त्यामध्ये भारतातील लठ्ठपण असलेल्या व्यक्ती समोरील आव्हानांबद्दल महत्त्वपूर्ण अंतर्ज्ञान समोर आलं आहे. या अभ्यासात लठ्ठपणाबद्दल जागरूकता, समज आणि व्यवस्थापन यांच्यातील महत्त्वपूर्ण फरक अधोरेखित झाला, परिणामी उपचारांसाठी एकात्मिक, दीर्घकालीन दृष्टिकोनाची आवश्यकता ठळकपणे मांडण्यात आली. भारतात लठ्ठपणा व्यवस्थापनासाठी व्यापक दृष्टिकोनाची वाढती गरज देखील यातून दिसून येते. अभ्यासात असं आढळून



आलं आहे की भारतातील लठ्ठपणा असलेल्या व्यक्तीं पैकी एक तृतीयांश वव्यक्तींना त्यांच्या स्थितीची तीव्रता माहिती नसते, बहुतांशवेळा त्यांची अशी समजूत असते कि त्यांचं वजन योग्य पातळीवर आहे. किंवा ते स्थूल आहेत अशाप्रकारे लठ्ठपणा नाकारण्यातून व्यापक गैरसमज आणि त्याच्या परिणामांबद्दल जागरूकतेचा अभाव असल्याचे दिसून येते, त्यामुळे उपचारांना उशीर होतो आणि आरोग्यावर वाईट परिणाम होतात.

लठ्ठपणा हा शरीराच्या प्रत्येक भागावर परिणाम करणाऱ्या अनेक गुंतागुंतींशी संबंधित आहे ज्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. यामध्ये शारीरिक, चयापचय, हृदय आणि रक्तवाहिन्यासंबंधी, कर्करोगाशी संबंधित, मानसिक आणि इतर आरोग्य समस्यांचा समावेश आहे.

पाचपैकी दोन लठ्ठपणा असलेल्या व्यक्ती उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्ट्रॉल आणि मधुमेह यासारख्या आजारांनी ग्रस्त असे आढळून आले आहे. वैद्यांच्या म्हणण्यानुसार अनेक लठ्ठपणा असलेल्या व्यक्तींमध्ये उच्च रक्तदाब (३२%), उच्च कोलेस्ट्रॉल (२७%), आहाराचे विकार (२३%) आणि हृदय आणि रक्तवाहिन्यासंबंधी रोग (१९%) यासारख्या १ ते ४ सह-व्याधी असतात; लठ्ठपणा हा एक दीर्घकालीन आजार आहे, ज्यासाठी वैद्यकीय हस्तक्षेपाची आवश्यकता आहे हे यातून ठामपणे सांगता येते. नोवो नोर्डिस्क इंडियाच्या चिकित्सालयीन, वैद्यकीय, नियामक आणि फार्माकोव्हिजिलन्सच्या उपाध्यक्षा डॉ. माया शर्मा यांनी या समस्येचे निराकरण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि सांगितले की, ''लठ्ठपणा व्यवस्थापनाच्या दिशेने पहिले पाऊल म्हणजे हा एक दीर्घकालीन आजार आहे हे समजून घेणे. आपल्याला लठ्ठपणा असलेल्या व्यक्तींना अशा साधनांसह पाठिंबा देण्याची आवश्यकता आहे ज्यामुळे त्यांना वजन कमी करण्यास मदत होण्यासोबतच कालांतराने ते गुंतागुंती नियंत्रणात ठेवण्यासही मदत झाली पाहिजे''

## एसयूडी लाइफने एक नवीन उत्पादन लाँच केले - एसयूडी लाइफ गॅरंटी रॉयल

नागपूर दि.६ (प्रतिनिधी)- एसयूडी लाइफने एसयूडी लाइफ गॅरंटी रॉयल लाँच केली, ही एक नॉन-लिंक्ड, नॉन-पार्टिसिपेटिंग इंडिविजूअल सेविंग्ज योजना आहे, जी तुम्हाला आणि तुमच्या प्रियजनांना जीवनातील महत्त्वाचे टप्पे गाठण्यात मदत करताना हमीदार आर्थिक सुरक्षा देण्यासाठी तयार केली आहे. अशा जीवनाची कल्पना करा जिथे तुमची आर्थिक उद्दिष्टे, सुरक्षितता आणि निश्चिततेसह अखंडपणे सांभाळली जातील, जिथे तुम्ही तुमच्या प्रियजनांच्या गरजा आत्मविश्वासाने पूर्ण करू शकता, तुमची स्वप्ने साध्य करू शकता आणि जीवनाच्या अनपेक्षित वळणांवर संपूर्ण खात्रीने नेव्हिगेट करू शकता. एसयूडी लाइफ गॅरंटी रॉयल तुम्हाला हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यास मदत करते, ज्यामुळे तुम्हाला आर्थिक स्थिरतेसह चिंतामुक्त जीवन जगता येते.

## बजाज फिनसर्व्ह एएमसीने कन्ट्रेरियन गुंतवणूक धोरणासह बजाज फिनसर्व्ह मल्टी कॅप फंड लाँच केला

नाशिक दि.६ (प्रतिनिधी)- बजाज फिनसर्व एएमसीने बजाज फिनसर्व मल्टी कॅप फंड लाँच करण्याची घोषणा केली आहे. ही एक ओपन-एंडेड इक्विटी योजना असून ती लार्ज कॅप, मिड कॅप आणि स्मॉल कॅप स्टॉकमध्ये गुंतवणूक करणार आहे. सदस्यतासाठी हा फंड ६ फेब्रुवारी २०२५ रोजी सुरू होईल आणि २० फेब्रुवारी २०२५ रोजी बंद होईल.

बजाज फिनसर्व्ह मल्टी कॅप फंड न वापरलेल्या आणि कमी मूल्यांकित संधी ओळखण्यासाठी लोकप्रिय भावनेच्या विरोधात जाऊन कन्ट्रेरियन धोरण वापरणार आहे. या धोरणात्मक दृष्टिकोनात अनुकूल नसलेल्या मालमत्ता खरेदी करणे किंवा लोकप्रिय मालमत्ता विकणे समाविष्ट असू शकते. फंड व्यवस्थापक बाजारातील ट्रेंड आणि गुंतवणूकदारांची भावना यांचे बारकाईने विश्लेषण करून मूल्यनिर्धारणातील विसंगती आणि गुंतवणुकीच्या संधी शोधतील. यामध्ये आर्थिक आणि व्यावसायिक चक्रे, तात्पुरते व्यावसायिक अडथळे, उलाढालीच्या गोष्टी आणि दुर्लक्षित वाढीचे घटक यांचा विचार केला जाईल.

हा फंड लार्ज, मिड आणि स्मॉल कॅप कंपन्यांमध्ये संतुलित गुंतवणूक राखून विविधतेने समृद्ध आणि संतुलित पोर्टफोलिओ तयार करेल. या शिस्तबद्ध गुंतवणूक धोरणाच्या मदतीने, इतरांच्या नजरेत न पडलेल्या संधी शोधून दीर्घकालीन उत्कृष्ट परतावा मिळवणे हे मल्टी कॅप फंडाचे उद्दिष्ट असेल.

हा फंड लार्ज कॅप, मिड कॅप आणि स्मॉल कॅप या सर्व विभागांमध्ये विविधतेने गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी योग्य पर्याय आहे. तसेच, बाजारातील अस्थिरतेच्या काळात ठोस गुंतवणुकीची संधी देणारा आहे. गुंतवणूकदारांनी किमान ५ वर्षे किंवा त्याहून अधिक मुदतीसाठी गुंतवणूक ठेवण्याचा विचार करावा, जेणेकरून कन्ट्रेरियन संधींची पूर्ण क्षमता साधता येईल.

## ऑर्किड्स द इंटरनॅशनल स्कूलने 'बोर्ड परीक्षा स्मार्ट प्रेप सिरीज' सुरू केली

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- ऑर्किड्स द इंटरनॅशनल स्कूलने विद्यार्थ्यांसाठी सीबीएसई बोर्ड परीक्षेच्या तयारीत क्रांती आणणारी 'बोर्ड परीक्षा स्मार्ट प्रेप सिरीज' सुरू केली आहे. २५ पेक्षा जास्त आयआयटीयन शिक्षकांनी घेतलेल्या या मालिकेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, बीजगणित, भूमिती आणि इंग्रजी या विषयांवर सखोल मार्गदर्शन प्रदान केले आहे. यात परीक्षा-केंद्रित धोरणे आणि प्रभावी समस्या-सोडवण्याच्या पद्धतींचा समावेश आहे.

या उपक्रमाविषयी बोलताना ऑर्किड्स द इंटरनॅशनल स्कूलच्या आडगाव परिसर प्रमुख ईरा शर्मा यांनी सांगितले की, बोर्ड परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा आहे आणि आम्हाला त्यांना उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी सर्वोत्तम साधने पुरवायची आहेत.

# त्यागवंती रमामाऊली

भीमरावांची ती सावली
दिन दलितांची आई
अशी भाग्यशाली त्याग मूर्ती
माझी आई माता रमाई

...असे म्हणतात की, प्रत्येक यशस्वी पुरुषांच्या यशात स्त्रीचा सिंहाचा वाटा असतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या यशामागे जिजाऊंचा वाटा होता, तर ज्योतिराव फुले यांच्या यशस्वी जीवन कार्यामागे सावित्रीबाई यांचा वाटा होता. त्याचप्रमाणे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार , दलितांचे उद्धारक, थोर कायदे पंडित, युगांचा युगांधर , बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनात त्यांच्या थोर कार्यात, सुशील, कर्तव्यदक्ष, त्यागमूर्ती, विनम्रतेची व शालीनतेची मूर्ती माता रमाई यांचा सिंहाचा वाटा होता.माता रमाई फार कष्टाळू,मेहनती व प्रेमळ होत्या. आपल्या सर्व आशा-अपेक्षांचा त्याग करून लाखो दलितांना स्वाभिमानाची शिकवण देणाऱ्या माता रमाईचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ ला एका गरीब कुटुंबात झाला होता.

त्यांचे वडील भिकू धोत्रे (वलंगकर) व आई रुक्मिणी यांच्यासह रमाबाई दाभोळ जवळील वंणदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना ३ बहिणी व एक भाऊ शंकर होता. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकू दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या बाजारापर्यंत पोहोचवत असे. त्यांना छातीचा त्रास होता. रमा लहान असतानाच त्यांच्या आई यांचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकू यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत राहायला गेले.

**रमाबाई यांचा विवाह -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमराव नामक मुलांसाठी वधू पाहत होते. सुभेदारांना भायखळा मार्केट जवळ राहणाऱ्या वलंगकरांकडे लग्नाची मुलगी असल्याचे समजले. तेव्हा सुभेदार रमाकडे गेले. आणि रमाला बघितले. सुभेदारांना रमा पसंत पडली. त्यांनी रमाच्या हाती साखरेची पुढे दिली.रमाई व भीमरावांचे लग्न भायखळ्याच्या भाजी मार्केटमध्ये इ.स.१९०६ यावर्षी झाले. विवाहप्रसंगी बाबासाहेबांचे वय १४ वर्ष तर रमाई चे वय ९ वर्षे होते. त्यावेळी बालविवाहाची प्रथा समाजात रुढ होती. लग्नात लग्न मंडप तसेच पंचपक्वानाच जेवण, झगमग रोशनाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हे लग्न पार पडले. माता रमाई यांना जीवनात फारच दुःख सहन करावे लागले.

**रमाबाई यांचे कष्टमय जीवन -**

इ.स. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले होते. त्यावेळी रमाईची खूप वाताहत होत होती. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना रमाईचे हाल पावले नाहीत.त्यांनी काही पैसे जमा केले. व ते पैसे रमाईला देऊ केल. तिने त्यांच्या भावनांचा आदर केला पण ते पैसे घेतले नाहीत. स्वाभिमानी पतीची ती स्वाभिमानी पत्नी जिद्दीने दुःखाशी अडचणींशी गरिबीशी झुंजत होती. मृत्युसत्र दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता व प्रेरणास्थान म्हणजे रमाई. रमाईने अनेक मरणे पाहिली. प्रत्येक मरणाने तीही थोडी थोडी मेली. मरण म्हणजे काय कळत नव्हते त्या वयात. आई-वडिलांचा मृत्यू. १९१३ साली रामजी सुभेदाराचा मृत्यू. १९१४ ते १९१७ साली बाबासाहेब अमेरिकेला असताना रमेशचा मृत्यू. ऑगस्ट १९१७ मध्ये बाबांची सावत्र आई जिजाबाईचा मृत्यू. पाठोपाठ मुलगी इंदू. बाबासाहेबांचा मोठा भाऊ आनंदराव व आनंदरावांचा मुलगा गंगाधरचा मृत्यू. १९२१ बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, व १९२६ मध्ये राजरत्नचा मृत्यू पाहिला. बाबासाहेबांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांना कळविले नाही. परदेशात जाऊन ज्ञानसाधना करणाऱ्या बाबासाहेबांना मात्र रमाईने कधी आपल्या दुःखाची झळ पोहोचू दिली नाही. पती परदेशात शिक्षणासाठी गेले. रमाई एकट्या पडल्या.घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या




थापल्या.सरपणासाठी वणवण फिरल्या. पोयबावाडीतून दादर माहीम पर्यंत जात असत. बॅरिस्टरांची पत्नी शेण वेचते म्हणून लोक नावे ठेवतील. म्हणून पहाटे सूर्योदयापूर्वी व रात्री आठ नंतर गोवऱ्या थापायला वरळीला जात असत. मुलांसाठी उपवास करत असत.

अस्पृश्यतेच्या अग्नी दिव्यातून होरपळून निघालेले बाबासाहेब आता समाजाला अस्पृश्यतेच्या रोगातून मुक्त करण्यासाठी व त्यासाठी निष्णात डॉ. होण्यासाठी अपार कष्ट घेऊ लागले. अर्धपोटी उपाशी राहून १८ -१८ तास अभ्यास करू लागले. त्याच वेळी रमाईने आपल्या निष्ठेने ,त्यागाने आणि कष्टाने स्वतः च्या संसाराचा गाडा हाकलून बाबासाहेबांना ध्येय गाठण्यासाठी मदत केली.

डॉ. बाबासाहेब प्रदेशातून शिक्षण घेऊन मुंबईला आले असता त्यांच्या स्वागताला सर्व आंबेडकरी समाज मुंबई बंदरात आला. रमाईला नेसण्यासाठी चांगली साडी नव्हती.म्हणून त्यांनी छत्रपती शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या सत्कार प्रसंगी दिलेला भरजरी फेटा नेसून बाबासाहेबांच्या स्वागतासाठी आल्या. ते बोटीतून उतरताच त्यांच्या जयजयकाराने बंदर दुमदुमून गेले. अनेक जण त्यांना भेटत होते. हस्तांदोलन करीत होते. पण रमाई मात्र लांब कोपऱ्यात उभी होती. डॉ. बाबासाहेबांची नजर त्यांच्या रामुवर गेली. ते जवळ गेले. त्यांनी विचारले, रामू तू लांब का उभी राहिलीस? रमाई म्हणाले, तुम्हाला भेटण्यासाठी सारा समाज आतुर झाला असताना मी तुम्हाला अगोदर भेटणे योग्य नाही. मी तर तुमची पत्नीच आहे. मी तुम्हास कधीही भेटू शकते.

**बाबासाहेब आंबेडकरांच्या आठवणी -**

रमाईनी २८ वर्ष बाबासाहेब आंबेडकरांना साथ दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्ययनात व्यत्यय येऊ नये म्हणून त्या राजगृहाच्या प्रवेशद्वारावर तासनताच बसून राहायच्या. बाबासाहेबांना कोणी भेटायला आल्यावर त्यांच्याशी तितक्याच अदबीने वागत. '' साहेब पुस्तकांच्या कोंडाळ्यात आहेत, नंतर भेटा, '' असे म्हणत. आलेल्याची रवानगी करताना त्यांचे नाव, गाव, कामाचे स्वरूप, पुन्हा कधी येणार आहात, हे सारे एका नोंदवही टिपण्यास सांगत.

**रमाबाई ते रमाई -**

एकदा बाबासाहेब आणि रमाई दादरच्या राजगृह बंगल्यावर राहत होते. त्यावेळी एकदा अचानक बाबासाहेबांना परदेशी काही कामानिमित्त जायचे होते. पण रमाईला एकटे घरांमध्ये कसे राहायला ठेवायचे म्हणून बाबासाहेब धारवाडच्या त्यांच्या वराळे मित्रांकडे रमाईला पाठवले व काही दिवस तिकडेच राहायला सांगितले. ते वराळे काका धारवाड मध्ये लहान मुलांचे वस्तीगृह चालवत असत. त्या वस्तीगृहाच्या आवारात अनेक लहान मुले खेळायला येत असत. एकदा अचानक दोन दिवस ते लहान मुले खेळायलाच आली नाही. म्हणून रमाईने वराळे काका यांना विचारले, दोन दिवस झाली ही मुले कुठे गेली आहेत ? खेळायला आवारात का आली नाही ? त्यावेळी वराळे म्हणाले, ती लहान मुले दोन दिवसापासून उपाशी आहेत. कारण वस्तीगृहाची अन्नधान्याचे अनुदान महिन्याला मिळायचे ते अजून मिळालेले नाही. ते मिळायला अजून तीन दिवस लागतील. अजून तीन दिवस ही मुले उपाशीच राहणार आहेत.

वराळे अगदी कंठ दाटून ते म्हणाले. त्यावेळी रमाई लगेच आपल्या खोलीमध्ये गेल्या आणि रडत बसल्या. कपाटातला सोनं ठेवलेला डबा आणि आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून वराळे यांच्याकडे देऊन म्हणाल्या, तुम्ही ह्या बांगड्या आणि डबा ताबडतोब विकूण किंवा गहान ठेवून द्या आणि लहान मुलांसाठी खाण्याच्या वस्तू घेऊन या ! मी अजून तीन दिवस ही लहान मुले उपाशी नाही पाहू शकत. त्यावेळी वराळे त्या बांगड्या आणि डबा घेऊन गेले.आणि लहान मुलांसाठी जेवणाच्या वस्तू विकत घेऊन आलेत. लहान मुले त्यावेळी पोट भरून जेवण करीत असतांना खूप आनंदी बघतांना पाहून रमाई खूप आनंदी झाल्या. तिचा आनंद गगनात मावत नव्हता. मग त्यावेळी ही सगळी लहान मुले रमाबाई यांना ''रमाआई '' म्हणून बोलायला लागले. आणि त्या क्षणापासून रमाबाई ही ''माता रमाई ''झाली. आणि ती सगळ्यांची आई .झाली.

ख्यातनाम गायक ''मिलिंद शिंदे'' म्हणतात......

''भुकेल्या मुलांची दशा पाहुनी
भुकेल्या मुलांची दशा पाहुनी
बांगड्या... सोन्याच्या
रमानं दिल्या काढूनी .
धन्य रमाई । धन्य रमाई''

रमाबाईचे शरीर काबाळ कष्टाने पोखरून गेले होते. रमाबाईचा आजार बळावला होता. इसवी सन १९३५ च्या जानेवारी महिन्यापासून रमाईचा आजार वाढतच चालला होता. १९३५ ला तर आजार खूपच विकोपाला गेला.बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. औषधोपचारही लागू होत नव्हता.एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यापासून बाबासाहेब आजारी रमाईच्या जवळ बसून राहू लागले. आजारी रमाई त्यांच्याकडे एकट्या बघत असत. बोलण्याचा प्रयत्न करीत असत. पण अंगात त्राण नसल्यामुळे त्या बोलू शकत नव्हत्या. त्यांना स्वतः बाबासाहेब औषध देत असत. आणि कॉफी किंवा मोसंबीचा रस स्वतःच्या हाताने पाजण्याचा प्रयत्न करीत असत. बाबासाहेबांवर दुःखाचा फार मोठा आघात झाला. दादरच्या राजगृहासमोर लाखो लोक जमले होते. यशवंतबरोबर दीनांना पोरका करणारा दिवस उजाडला. २७ मे १९३५ रोजी सकाळी ९ वाजता रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाला. रंजल्यागांजल्यांची रमाई माता त्यांना अंतरली होती.दुपारी दोन वाजता रमाईची प्रेतयात्रा वरळी स्मशानाकडे निघाली.

आम्हा दुरावली मायेची सावली
निर्वाण पावली आमची रमाई माऊली

पहाडासारखा महामानव बाबासाहेब ढसाढसा रडले. जवळजवळ तीस वर्षाच्या संसारात प्रेमाने भक्कम सोबत देणाऱ्या रमाबाई मध्येच अचानक सोबत सोडून न परतीच्या वाटेने कायमच्या दूर निघून गेल्या आणि बाबासाहेब आपल्या संसारात अगदी एकांकी झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे रमाबाई वर निस्सीम प्रेम होते.तिचे कष्ट पाहून त्यांचे मन तुटायचे. त्यांनी आपल्या रामूला पाठवलेल्या पत्रात त्यांच्या या भावना प्रतिबिंबित व्हायच्या. थॉट्स ऑन पाकिस्तान हा आपला ग्रंथ बाबासाहेबांनी आपल्या ''प्रिय रामूला '' अर्पण केला. अर्पणपत्रिकेत बाबासाहेबांनी लिहिले आहे की, तिच्या हृदयाचा चांगुलपणा,मनाची कुलिनता , आणि शीलाच्या पावित्र्यासह तिचे शालीन मनोधैर्य नि माझ्याबरोबर दुःख सोसण्याची तिची तयारी अशा दिवसात तिने मला दाखविली. जेव्हा मी नशिबाने लादलेला मित्रविरहित काळ चिंतेसह कंठीत होतो. या बिकट परिस्थितीत साथ देणाऱ्या रामूच्या आठवणीत कोरलेले हे प्रतीक... म्हणजे थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ होय.''आपल्या पत्नीबद्दलच्या भावना बाबासाहेबांच्या या अर्पण पत्रिकेतून व्यक्त झाल्या आहेत.

पुनश्च माता रमाईला विनम्र अभिवादन !

**- सौ. शारदा अरुण गणोरकर**
कांडली,परतवाडा
मो.बा.-८८८८५०३२९२